मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत अतिरिक्त मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२,E- १७१०८४६/यो-११
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक : १९ जून, २०२६

वाचा :

१.ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५

२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१६८६२४७/यो-११, दि.०४.०६.२०२६

३. ग्रामविकास विभाग, शासन पत्र क्र. मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१३४८८०४/यो-११, दि.०८.०६.२०२६

४.अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र.विकास-१/कार्या-६/९६/२०२६, दि.१२.०६.२०२६

प्रस्तावना:

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राज्यभर एकसमान निकष आणि न्याय्य मुल्यांकन सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, तालुकास्तरीय मुल्यमापनाची पडताळणी करण्यासाठी अंदाजे ३० ते ३४ मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या स्थापन करण्यास संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये ३४ जिल्ह्यांसाठी ३४ मुल्यमापन पडताळणी समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

नाशिक विभागाच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांकडे असलेल्या जिल्ह्यांतील, रायगड, पुणे व नागपूर या जिल्ह्यांत पडताळणी करावयाच्या ग्रामपंचायतींची संख्या जास्त असल्याने रायगड व नागपूर जिल्ह्यासाठी प्रत्येकी १ अतिरिक्त समिती व पुणे जिल्ह्यासाठी २ अतिरिक्त समित्या गठीत करण्याची विनंती संदर्भ क्र.४ अन्वये करण्यात आली आहे.

त्यानुसार, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत रायगड, पुणे व नागपूर जिल्ह्यांसाठी अतिरिक्त मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय मुल्यमापनाची पडताळणी करण्यासाठी अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांच्या विनंतीनुसार, नाशिक विभागाच्या अधिपत्याखाली खालीलप्रमाणे एकूण ४ अतिरिक्त मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या स्थापन करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अतिरिक्त समिती |
|---|---|---|
| १. | रायगड | १ |
| २. | पुणे | २ |
| ३. | नागपूर | १ |

**२.** अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी आपल्या विभागातील महाराष्ट्र विकास सेवेतील S-२३ वेतनस्तरावरील अथवा समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती उपरोक्त ४ समित्यांच्या अध्यक्षपदी करावी. सद्यस्थितीत एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)- ११ मधील परिविक्षाधीन गटविकास अधिकारी यांची संख्या मर्यादित असल्याने मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समितीमध्ये दोन्ही सदस्य परिविक्षाधीन सहायक गट विकास अधिकारी राहतील, याबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

**३.** आपल्या अधिनस्त स्थापित सर्व मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्यांचे नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांतील अपर आयुक्त (विकास) यांची राहील

**४.** संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयातील समितीची भुमिका/ कार्ये व इतर अटी व शर्ती कायम राहतील.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०६१९१६२२२७९९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.06.19 19:01:55 +05'30'

**(प्रशांत पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,

८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

१०. सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,

११.विभागीय आयुक्त, सर्व,

१२.अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व,

१३.जिल्हाधिकारी, सर्व,

१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,

१५. निवडनस्ती यो-११.